**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७३९/२००७**

**१) श्री शोएब अहमद वली भाई कन्नौजी**
**साप्ताहिक रोशन वतन, इतवारा चौक, वर्धा-४४२००१.**
**मु.पो.ता.जिल्हा वर्धा.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मा.श्री मो.कृ.पुराडउपाध्ये साहेब**
**उपसचिव, नगर विकास विभाग, नवीन प्रशासन भवन,**
**१३ वा मजला, मंत्रालय के सामने, मुंबई-३२.**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २८.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी सुध्दा गैरहजर आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडे व राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे दोन द्वितीय अपीले दाखल केली आहे. मुंबई येथे दाखल केलेल्या अपीलामध्ये सुनावणी झाली. परंतु, अपीलकर्ता हजर राहू शकले नाही व नागपूर येथील सुनावणीस वकील सुध्दा हजर राहाणार आहे असे दिनांक ५.६.२००८ रोजी दाखल केले होते. तसेच सकाळी १०.०० वाजता अपीलाची सुनावणीबाबत कळविण्यात आले आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता हे २.०० वाजता उपस्थित राहाणार असे त्यांनी आयोगास कळविलेले आहे. परंतु, दुपारी २.०० च्या पुढे अजून चार अपीले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी सुनावणी ही दूपारी घेता येणार नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांची दुपारी १२.४० पर्यंत वाट पाहिली व हजर नसल्यामुळे कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,

अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात म्हटल्याप्रमाणेच दिनांक ५.१२.२००७ रोजी मुख्य माहिती आयुक्त यांनी अपीलकर्ता यांचे अपीलाप्रमाणे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला असून अपील निकाली काढण्यात आलेले आहे, असे दिसून येते. सदरचा अपील क्रमांक २००७/१२७४/०१ च्या निर्णयाची प्रत दाखल केली आहे. व त्याबाबत दिनांक ९.६.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप सचिव श्री रा.म. चौधरी यांनी आयोगास अपीलकर्त्यांच्या राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडील दिनांक ३१.५.२००७ रोजी दाखल केलेल्या अपीलामध्ये निर्णय दिलेला असून त्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली असून त्याबाबतची पोच सुध्दा दाखल केलेली आहे, असे आयोगाच्या निदर्शनास आणले. व द्वितीय अपीलाच्या अर्जाच्या अनुषंगाने एकदा सुनावणी झाली असल्यामुळे पुन्हा त्याच संदर्भात कार्यालयात हजर राहावे किंवा कसे याबाबत कळवावे. हजर राहाणे आवश्यक असल्यास कृपया १५ दिवसांच्या नंतर तारीख देण्यात यावी असे आयोगास कळविलेले दिसून येते. आयोगास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विचारल्याप्रमाणे सुनावणीच्या तारखेस हजर राहावे किंवा नाही हे कळविण्याची आवश्यकता नाही व तसे कळविलेले नसल्यामुळे कदाचित जन माहिती अधिकारी हे हजर राहीलेले दिसून येत नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२००७ ला राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडे जे अपील दाखल केले आहे तेच अपील पुन्हा दिनांक २६.६.२००७ रोजी नागपूर येथे दाखल केले आहे. यावरुन आयोगास काहीही काम दिसत नाही असा अपीलकर्ता यांचा समज झालेला दिसून येतो. वास्तविक, अपीलकर्ता हे पत्रकार आहे व पत्रकारास कमीत कमी अधिनियमाच्या तरतूदींची माहिती असणे आवश्यक आहे. परंतु त्याबाबतची अपीलकर्ता यांना आवश्यकता वाटत नाही. व सुनावणी होऊन निर्णय दिलेल्या अपीलाच्या संदर्भात सुध्दा पुन्हा सुनावणी घेणे व ती पण त्यांच्या सोईंनी घ्यावी असे त्यांनी कळविलेले आहे. यावरुन अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या तरतूदींचा गैरवापर करीत आहे, असे दिसते. व आयोगाचा सुध्दा अवमान करीत आहे असे दिसते.

नागरिकांना माहितीचा अधिकार हा मिळवून दिलेला असला तरी अपीलकर्त्यांच्या अशा प्रकारच्या तीच ती अपीले वारंवार दाखल करण्याच्या सवयीमुळे ज्यांना खरोखर माहितीची आवश्यकता आहे त्यांचे अपील हे सुनावणीस येत नाही व ज्यांची सुनावणी
झाली, निर्णय झाला, अशी अपीले पुन्हा पुन्हा सुनावणीस येत असल्यामुळे आयोगापुढील अपीलांची संख्या ही प्रचंड प्रमाणात प्रलंबित दिसते. व वरील सर्व कारणास्तव अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक ३१.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोग, मुंबई येथे दाखल केलेले अपीलामध्ये दिनांक ५.१२.२००७ रोजी निर्णय झालेला असल्यामुळे व पुन्हा दिनांक २६.६.२००७ रोजी त्याच दाखल केलेल्या अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणी घेणे व निर्णय देणे हे नैसर्गिक न्यायाच्या विरुध्द असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२८.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**